# भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

जा.क्र. २८८/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक ०६/०६/२०१८

**१) आरएनडीचे लोखंडी कटपीसची चोरी :-**

दिनांक ०४/०६/२०१८ चे ११.३० चे ०५/०५/२०१८ चे ०५.३० वाजता दरम्यान यातील सनफ्लॅग कंपनी वरठी येथील खुल्या परिसरात पडलेल्या लोहयापैकी ५० किलो आरएनडीचे लोखंडी कटपीस किंमती २,०००/-रु. चा माल कोणीतरी अज्ञात चोराने चोरुन नेल्याने फिर्यादी सुदीप पुरुषोत्तम वालदे वय ३६ वर्ष, रा. वरठी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन वरठी येथे कलम ३७९ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. ऊके पोलीस स्टेशन वरठी हे करीत आहेत.

**२) ट्रॅक्टर चालकांने वाहनाला धडक देवुन वाहनाचे नुकसान केल्याने गुन्हा नोंद :-**

दिनांक ०५/०६/२०१८ चे १३.३० ते १४.०० वाजता दरम्यान यातील फिर्यादी प्रल्हाद चोकानी इंदुरकर वय ४६ वर्ष, रा मुजेबाद लेआऊट नागपुर हा आपले मित्रासह त्याचे ताब्यातील वाहन क्र. एमएच ३२ एस ९९०० इनोव्हा ने नागपुर कडे जात असतांना विरुध्द दिशेने येणाऱ्या निळया रंगाचा बिना क्रमांकाचा आरोपी ट्रॅक्टर चालकाने त्याचे ताब्यातील वाहन हयगयीने, निष्काळजीपने चालवुन फिर्यादीचे वाहनाचे अंदाजे २०,००,०००/-रु. चे नुकसान केल्याने फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन वरठी येथे कलम २७९,४२७ भादवी. सहकलम १८४,५०(अ)/१७७ मोवाका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. भाजीपाले पोलीस स्टेशन वरठी हे करीत आहेत.

**३) मोटारपंपची चोरी :-**

दिनांक ०३/०६/२०१८ चे ११.०० चे ०५/०५/२०१८ चे ०९.३० वाजता दरम्यान यातील फिर्यादी रजाराम सिताराम राऊत वय ६५ वर्ष, रा. विनोबा नगर तुमसर याचे शेतातील हॉलकॉम कंपनीची ५ एचपी समरर्शिबल मोटारपंप क्र. वि-५/आयआरएफ ५/१ ३ टिपी एजीओएएच ९८९१ किंमती २१,८००/-रु. चा माल बोरवेल मधुन कोणीतरी अज्ञात चोराने चोरुन नेल्याने फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन करडी येथे कलम ३७९ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सफौ. कटरे पोलीस स्टेशन करडी हे करीत आहेत.

**४) मोटार सायकल भरधाव वेगाने चालवुन स्लीप होवुन एकाचा मृत्यु व स्वत: जखमी होण्यास कारणीभुत झाल्याने गुन्हा नोंद :-**

दिनांक ०४/०६/२०१८ चे २४.०० वाजता दरम्यान यातील आरोपी व मृतक हे मोटार सायकलने नास्ता करण्या करीता एनएच ६ रोडने भंडारा कडे जात असतांना यातील आरोपी चालकाने त्याचे ताब्यातील वाहन भरधाव वेगाने व निष्काळजीपने चालविल्याने मोटार सायकलने एमआयटी कॉलेज समोर स्लिप होवुन रोडवर पडल्याने मागे बसलेला मृतक- राहुल दयालनाथ चौव्हान वय १८ वर्ष, रा. पेट्रोलपंप ठाणा यास जबर मार लागुन जागीच मरण पावला व आरोपीचे हाताला व गालाला व हनुवटीला मार लागुन जखमी झाल्याने यातील आरोपी हा मृतकचे मरणास व स्वत: जखमी झाल्याने आरोपीचे बयान व डॉ. रिपोर्ट वरुन सरतर्फे फिर्यादी पोहवा. मानिक चोपकर वय ६० वर्ष, रा. जवाहरनगर यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन जवाहरनगर येथे कलम २७९,३३७३०४(अ) भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनि. मेश्राम पोलीस स्टेशन जवाहरनगर हे करीत आहेत.

**५) नगदी पैश्याची चोरी :-**

दिनांक ३०/०५/२०१८ चे ०७.०० वाजता पासुन ते ०५/०६/२०१८ पर्यत यातील फिर्यादी सौ. शोभा मोहन मेश्राम वय ४८ वर्ष, रा. इंदीरा नगर सावरी ही मागील दाराची कडी कोंडा व समोरील दाराला कुलुप लावुन बाहेरगावी गेली असता कोणीतरी अज्ञात चोराने फिर्यादीचे मागील दाराचा कडीकोंडा तोडुन आत प्रवेश करुन घरात ठेवलेल्या स्टिल डब्यात ठेवलेले नगदी ८,०००/-रु. चोरुन नेल्याने फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन जवाहरनगर येथे कलम ४५४,४५७,३८० भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. सार्वे पोलीस स्टेशन जवाहरनगर हे करीत आहेत.

६) विवाहीतेला शारीरिक व मानसिक त्रास देवुन हुंडयाची मागणी केल्याने गुन्हा नोंद :-

दिनांक ०१/०५/२०१८ चे १७.०० ते आज पावेतो यातील फिर्यादीचे लग्ना नंतर आरोपीतांनी फिर्यादीला आपले वडीलाचे घरुन १,००,०००/–रु. हुंडा मागुण आण तरच तुला नांदवु असे म्हणुन शारीरीक व मानसिक त्रास दिल्याने फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट व महिला व मुलांकरीता सहायता केन्द्र भंडारा यांचे लेखी अहवाला वरुन पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ४९८(अ) भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. गायधने पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहेत.

५) महिलेस मोबाईलवर अश्लिल मॅसेज पाठवुन ईलेक्ट्रानीक मोबाईल फोनचा साधन सामुग्रीचा वापर केल्याने गुन्हा नोंद :-

दिनांक २८ /०५/२०१८ ते २९/०५/२०१८ चे १८.०० वजता दरम्यान यातील फिर्यादीचे मोबाईल क्र वर आरोपीने मोबाईल फोन व्दारे अश्लिल मॅसेज पाठवुन फिर्यादीला लज्जा येईल अशा प्रकारे (ईलेक्ट्रानीक मोबाईल फोनचा) साधन सामुग्रीचा वापर करुन गुन्हा केल्याने फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन तुमसर येथे कलम २९४,३५४(५)(२) भादवी. सहकलम ६७ आयटी ॲक्ट. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोनी. चव्हाण पोलीस स्टेशन तुमसर हे करीत आहेत.

६) संगनमत करुन डोक्यावर काठीने मारुन जखमी केल्याने गुन्हा नोंद :-

दिनांक ०५/०६/२०१८ चे १५.०० वाजता दरम्यान यातील फिर्यादी कन्हैया धानु टेकाडे वय ३५ वर्ष, रा. गर्रा बघेडा याने गाडीचे किरायाचे ९००/–रु. मागीतले असता यातील आरोपीने भांडण केले व संगनमत करुन फिर्यादीचे डोक्यावर काठीने मारुन जखमी केल्याने सौ. शोभा मोहन मेश्राम वय ४८ वर्ष, रा. इंदीरा नगर सावरी ही मागील दाराची कडी कोंडा व समोरील दाराला कुलुप लावुन बाहेरगावी फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन गोबरवाही येथे कलम ३२४,५०४,३४ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. वाघमारे पोलीस स्टेशन गोबरवाही हे करीत आहेत. .

७) संगनमत करुन चिचडी खत जाळुन नुकसान केल्याने गुन्हा नोंद :-

दिनांक २८/०५/२०१८ चे १९.०० वाजता दरम्यान यातील फिर्यादी शैलेन्द्र जिवन सतदेवे वय ४९ वर्ष, रा. तकीया वार्ड भंडारा याने संशयीत आरोपी क्र. १ चे वडीला कडुन खरेदी केलेल्या शेतजमीनीतील ३५० बोरे चिचडी खत शेतात ठेवले असता संशईत आरोपीतांनी संगनमत करुन जाळुन नुकसान केल्याने फिर्यादी यांचे लेखी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन लाखनी येथे कलम २८५,३४ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. सार्वे पोलीस स्टेशन लाखनी हे करीत आहेत.

८) संगनमत करुन लोखंडी रॉडने डोक्यावर मारुन गंभिर जखमी झाल्याने गुन्हा नोंद :-

दिनांक १६/०५/२०१८ चे १२. ३० ते ०१.०० वाजता दरम्यान यातील फिर्यादी भुषण यशवंत कावळे वय ४८ वर्ष, रा. संताजी वार्ड भंडारा याचा मोठे भाऊ किरण कावळे हा डि.एम.बार मध्ये दारु पित बसला असतांनी यातील आरोपीतांनी संगनमत करुन भावा सोबत तोंडातोंडी शाब्दीक भांडण करुन शिवीगाळ केली व तिघांनी हमला करुन लोखंडी रॉडने त्याचे डोक्यावर मारुन गंभिर जखमी केल्याने फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट व डॉक्टरी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ३२६,३५१,५०४,३४ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनि. बोरकर पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहेत.

१०) इसमाचा मृत्यु :-

दिनांक ०५/०६/२०१८ चे ०६.०० वाजता पुर्वी यातील मृतक प्यारकुमार देवदास सातक वय ३६ वर्ष, रा. गोंदेखारी हा दिनांक ०४/०६/२०१८ चे अंदाजे १०.३० वाजता दरम्यान नेहमी प्रमाणे दारु पाणी पिऊन येवुन घरी जेवन न करता कोणाला काही न बोलता छपरीत खाटेवर झोपला होता यातील फिर्यादीचा लहान भाऊ प्रविण हा उठविण्यास गेला असता भाऊ मृतक हा कोणत्याही प्रकारची हालचाल करीत नव्हता त्यामुळे घरच्यांनी त्यास पाहीले असता तो मरण पावल्याचे समजल्याने फिर्यादी अरविंद देवदास सातक वय २५ वर्ष, रा. गोंदेखारी यांचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन सिहोरा येथे कलम १७४ जाफौ. अवये मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास सफौ. ऊईके पोलीस स्टेशन सिहोरा हे करीत आहेत.

११) रेल्वेने कटुन अनोळखी इसमाचे प्रेत मिळुन आले. :-

दिनांक ०५/०६/२०१८ चे ०८.३० वाजता पुर्वी यातील अज्ञात मृतक १ अज्ञात ईसम वय अंदाजे ३५ वर्ष, वयोगटातील हा रेल्वेने कटुन पडुन असलेल्या स्थितीत आढळल्याने सरतर्फे फिर्यादी रजत किशोर खांडेकर वय २४ वर्ष, रा. देव्हाळी रेल्वे स्टेशन सुपरवायजर प्रबंधक देव्हाळी यांचे लेखी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन तुमसर येथे कलम १७४ जाफौ. अवये मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. सरोदे पोलीस स्टेशन तुमसर हे करीत आहेत.

**१२) औषधोपचारा दरम्यान इसमाचा मृत्यु :–**

दिनांक ३१/०५/२०१८ चे ००.३० ते ०३.३० वाजता दरम्यान यातील मृतक बिसराम रामधन कटोते वय ६५ वर्ष रा. सितासांवगी याची प्रकृती खराब झाल्याने त्यास औषधोपचारा करीता सामान्य रुग्नालय भंडारा येथे वार्ड क्र. ०९ मध्ये भरती केले असता उपचारा दरम्यान मरण पावल्याने डॉ. मेमो वरुन पो. स्टे. भंडारा येथे मर्ग क्र. ००/१८ कलम १७४ चे कागदपत्र प्राप्त झाल्याने सरतर्फे फिर्यादी पोहवा. निखाडे यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन गोबरवाही येथे कलम १७४ जाफौ. अन्वये नंबरी मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. तांडेकर पोलीस स्टेशन गोबरवाही हे करीत आहेत.

**१३) दारू पिवुन दारूच्या नशेत वाहन चालवीतांनी मिळुन आल्याने गुन्हा नोंद. :–**

दिनांक ०४/०५/२०१८ चे १९.३० ते १९.४५ वाजता दरम्यान यातील आरोपी चालकाने त्याचे ताब्यातील महाराष्ट्र राज्य परिवहन मंडळाची बस भंडारा वरुन नागपुरला घेवुन जात असतांना मुजबी येथे प्रवाशांना चालक हा दारु पिऊन दारुचे नशेत वाहन चालवित आहे. असे आढळुन आल्याने प्रवाशांचे तक्रारी वरुन आगार व्यवस्थापक यांनी मुजबी येथे जावुन आरोपीस घेवुन पो. स्टे. ला आणुन पेश केल्याने त्याचे वैद्यकीय परिक्षण केले असता ए. मा. यांचा सदर आरोपी हा मद्याचे सेवन करुन असल्याचे अहवाला वरुन सरतर्फे फिर्यादी फाल्गुन राखडे (आगार व्यवस्थापक रा. प. भंडारा ) यांचे पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम १८५(१) मदाका अन्वये गुन्हा दाखल करून पुढील तपास पोहवा. भोंगे यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहेत.

**१४) अवैध हातभट्टी,देशी दारु अडड्यांवर धाडी . :–**

दिनांक ०६/०६/२०१८ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पोलीस स्टेशन तुमसर, आंधळगाव, साकोली व लाखांदुर येथे हातभट्टी दारु अडड्यावर धाडी घालुन एकुण ०५ गुन्हे दाखल करून आरोपीतांच्या ताब्यातुन ३० लिटर हातभट्टी + २८५ किलो सडवा+ साहित्य २०,६१०/–रु. ३६ लिटर १८० मिली लिटर देशी दारु + २ मोटार सायकल किंमती १,००,७२४/–रु. चा असा एकुण १,२१,३३४/–रु. माल जप्त करण्यात आला.

**९) मोटार वाहन कायदयाखाली कारवाई. :–**

दिनांक ०६/०६/२०१८ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली एकुण ९१ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून अवैध प्रवासी – ०३, तीन सिटर वाहनाकरीता– ०३ ईतर वाहनांवरती – ८५ केसेस करण्यात आले आहे.

**(मपोउपनि.प्रणती लांजेवार)**
**माहिती कक्ष भंडारा**
**दुरध्वनी.क्र. ८८०५६५७२६२**

**प्रति,**

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.